| | |
|---|---|
| MHKO190004172019 | **निशाणी क्र.२२ खालील आदेश**<br>**IN**<br>**नियमीत दिवाणी दावा क्र.७५/२०१९**<br>**श्री.कृष्णात ऊर्फ कृष्णा शामराव खाडे व.३ वि.. सौ.वैशाली पांडुरंग सुतार व.३**<br>**(दिनांकः२९/०६/२०२४)** |

१. वादींनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जावरच त्यांचे म्हणणे दाखल केले व त्यांनी सदर अर्जास सक्त हरकत घेवुन अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली.

३. वादी व प्रतिवादी तर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

४. वादीतर्फे वकीलांनी असा युक्तीवाद केला की, दावा मिळकत १(ब) मध्ये वादींनी रिकाम्या जागेमध्ये मार्च,२०२० मध्ये पत्र्याचे घर बांधले आहे. तसेच सदर पत्र्याचे घराचे पुर्व–पश्चिम बाजुस वादींनी बांबुचे कंपाऊंड करुन पिके घेतलेली आहेत व फुलांची झाडे लावलेली आहेत. त्या अनुषंगाने वादी हे दाव्यामध्ये नवीन परिच्छेद क्र.६(अ) द्वारे दुरुस्ती करु इच्छीतात. तसेच दावा कलम ७ मध्ये दुरुस्ती करु इच्छीतात. प्रस्तावित दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, त्यांनी अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली आहे.

५. याउलट प्रतिवादींतर्फे वकीलांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तावित दुरुस्ती चुकीची, बेकायदेशीर व कालबाह्य आहे. वादींनी साडेतीन वर्षानंतर दुरुस्ती करीता अर्ज दिलेला आहे. प्रस्तुत अर्ज हा प्रामाणिक नाही. सबब, त्यांनी अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली आहे.

६. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता अद्याप संपरीक्षा सुरु झाली नसल्याचे दिसुन येते. वादींनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादीं विरुध्द हक्कज्ञापन, कायम मनाई मिळणेकरीता व दावा मिळकतीचे अग्रहक्काने खरेदीखत होवुन मिळणेकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत दावा दिनांक ०५/०७/२०१९ रोजी दाखल केला आहे. प्रस्तुत दावा दाखल केल्यानंतर मार्च,२०२० मध्ये वादींनी दावा मिळकत १(ब) मध्ये बांधकाम केले आहे. सबब, दावा मिळकत १(ब) मधील दावा दाखल केल्यानंतरची वस्तुस्थिती दाव्यामध्ये नमुद करणे आवश्यक आहे. प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. तसेच प्रस्तावित दुरुस्तीमुळे प्रतिवादींवर कोणताही अन्याय होणार नाही. दावा मिळकत १(ब) मधील सध्याची वस्तुस्थिती अभिलेखावर आल्यामुळे दावा अंतिमतः निकाली काढणेस मदतच होणार आहे. सबब, अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. परिणामी, मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**– आदेश –**

१. अर्ज निशाणी क्र.२२ मंजुर करण्यात येत आहेत.

२. वादींनी अर्जात नमुद केले प्रमाणे दाव्यामध्ये पुढील तारखेपर्यत दुरुस्ती करावी व दुरुस्त दाव्याच्या प्रती अभिलेखावर दाखल कराव्यात.

३.खर्चाबाबत आदेश नाही.

DILAWAR MAHAMAD GOUS MALIDWALE
Digitally signed by DILAWAR MAHAMAD GOUS MALIDWALE
Date: 2024.07.01 11:40:51 +0530

**(डि.एम.जी.मलिदवाले)**

दिनांकः२९/०६/२०२४

दिवाणी न्यायाधिश क. स्तर राधानगरी